रे. दिवाणी मुकदमा क्र. १४२/२०१३ मधील निशाणी क्र. १४९ वरील आदेश
(शहाजी करांडे वि हणमंत करांडे वगैरे)

१. प्रवादी यांनी सदरचा अर्ज साक्षीदाराची पुर्नतपासणी करणेकामी दाखल केलेला आहे.

२. प्रवादी यांची केस थोडक्यात पुढीलप्रमाणे –

प्रवादी यांचे म्हणयाप्रमाणे वादींनी नि १२७ वर दुरुस्तीसाठी अर्ज केलेला होता. त्या अर्जामध्ये नाशिक येथील घर मिळकतीचा उल्लेख दाव्यामध्ये करणेविषयी त्यांनी विनंती केलेली. प्रवादी यांनी यापूर्वी आपली कैफियत दाखल केली असून त्यामध्ये नाशिक येथे बांधण्यात आलेली घरे ही एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून बांधली असलेबददलचा उल्लेख करणेत आलेला आहे. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे वादींनी जरी त्यांचा अर्ज काढून घेतला असला तरी त्या अनुषंगाने प्रवादींनी पुढील उलटतपास करणे आवश्यक आहे. तशी संधी जर प्रवादींना मिळाली नाही तर प्रवादींचे नुकसान होवू शकते. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज सादर केलेला आहे.

३. वादी यांचे विद्वान वकील यांनी त्यांचे म्हणणे नि.१५० वर दाखल केलेले आहे. वादी यांच्या वकीलांचे म्हणण्याप्रमाणे या दावेचे कामी मुददा क्र २ हा पूर्वी काढणेत आलेला होता. तो वादी व प्रवादी यांनी केलेल्या कथनांनुसार काढणेत आलेला. मुददा काढलेनंतर वादी यांचे साक्षीदार यांना तपासणेत आले. वादींच्या साक्षीदारांचा उलट तपास हा त्यानंतर घेणेत आला. त्यानंतर सदर दावेचे कामी कोणताही असा बदल

घडला नाही की ज्यामुळे वादीचा उलटतपास पुन्हा घेणे प्रवादींना आवश्यक होवू शकते. प्रवादी यांना निव्वळ वेळ काढणेचा असलेने त्यांनी सदरचा अर्ज सादर केलेला आहे.

४. प्रवादी यांचे विद्वान वकील श्री पी. टी. जाधव व वादी यांचे विद्वान वकील श्री डी. एन. घाडगे यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकलेवर पुढीलप्रमाणे गुण या अर्जाचे कामी काढणेत येतात.

| अ.क्र. | गुण | उत्तर |
|---|---|---|
| १ | वादी यांचा पुर्नतपास घेणेसाठी केस प्रवादी यांना आहे काय ? | नाही |
| २ | काय हुकूम ? | अंतीम हुकूमाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### गुण क्रमांक १

५. प्रवादी यांनी या दावेचे कामी वादी यांचा पुर्नतपास घेणेविषयी विनंती केली आहे. प्रवादी यांचे म्हणण्याप्रमाणे वादींनी नि.१२७ वर अर्ज दाखल केलेला व नाशिक येथील मिळकती सामील करुन घेणेविषयी विनंती केलेली होती. तो अर्ज त्यांनी पुढे न चालवता काढून घेतला. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे दाव्यामध्ये आवश्यक मिळकतीविषयी मुददा काढलेला असून त्या अनुषंगाने प्रवादी याने कैफियतीमध्ये कथन केलेले आहे. त्यामुळे जास्तीचा उलटतपास घेणेविषयी प्रवादी यांना परवानगी मिळावी. वादी यांचे विद्वान वकील यांनी युक्तीवाद सादर केला की प्रवादी यांनी त्यांच्या

कैफियतीमध्ये जे कथन केलेले आहे त्या अनुषंगाने त्यांनी उलटतपास यापूर्वी घेतलेला आहे. नि.१२७ च्या अर्जाच्या अनुषंगाने कोणतीही नवीन परिस्थती न उदभवल्याने प्रवादी यांची विनंती रदद करणेविषयी त्यांनी विनंती केलेली आहे.

६. या दावेचे कामी दाखल असणारे कागदपत्र पडताळून पाहिलेवर प्रवादी यांनी आपली कैफियत व दुरुस्त कैफियत नि.३६ वर दाखल केली असलेचे दिसून येते. नि. ७६ वर मुददे नोंदवले असलेचे दिसून येते. तर दुरुस्त दाव्यास प्रवादींनी दिलेली कैफियत नि.१२४ वर दिसून येते. या दावेचे कामी वादी यांचेवतीने सा.क्र. १ शहाजी हणमंत करांडे यांना नि.८० वर तपासलेले आहे. त्यांचा जास्तीचा पुरावा दाखल झालेनंतर प्रवादी यांचे वकील श्री पी. टी. जाधव यांनी त्यांचा उलटतपास घेतलेला आहे. त्यानंतर सदरचा दावा हा पुढील साक्षीदारांच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे. या दावेचे कामी वादी यांनी सादर केलेला पुरावा व त्याअनुषंगाने प्रवादींनी केलेली विनंती जर पाहिली तर प्रवादी यांना वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास घेणेविषयी संपूर्ण संधी यापूर्वी उपलब्ध करुन देणेत आलेली होती. प्रवादी यांना नाशिक येथील मिळकतीविषयी जरी काही पुरावा सादर करायचा असेल तर तो त्यांच्या कैफियतीप्रमाणे प्रवादी यांच्या पुराव्यामध्ये ते सादर करु शकतात. वादीनी नि.१२७ वर सादर केलेला अर्ज हा त्यांनी काढून घेतला असलेने त्याबाबत कोणताही हुकूम पारीत करणेत आलेला नव्हता. त्यामुळे या दाव्याचे कामी नाशिक येथील मिळकतीविषयी कोणतीही नवीन परिस्थिती उदभवलेली नाही. प्रवादी यांना त्यामुळे उलटतपास घेणेविषयी कोणतेही कारण

उपस्थित होवू शकत नसलेने गुण क्र १ चे उत्तर नाही म्हणून देणेत येते.

७. प्रवादी यांनी सदरचा अर्ज हा साक्षीदाराचा पुर्नतपास घेणेकामी दाखल केलेला आहे. प्रवादींनी केलेली विनंती पाहता ती संयुक्तीक आहे असे म्हणता येवू शकत नाही. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येतात.

**आदेश**

१. प्रवादींचा अर्ज रदद करणेत येतो.

२. प्रवादींनी वादीला ३००/– रु खर्च अदा करावा.

सही/–

कडेगांव (वि.रा. घराळ)

दिनांक – २१/०६/२०१८ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव